**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी देवाशपथ खरे सांगतो की :

माझे नावः किशोर अशोक पाटेकर

वयः ३० वर्षे, व्यवसायः नोकरी

राहणारः बाळसई, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :**

०१. दि. २३/०१/२०२३ रोजी पोलीसांनी मला बाळसई गावात दत्त मंदीरासमोर पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. मी गेलो त्यावेळी तेथे गावचे पोलीस पाटील, पंच मधुकर ठमके, पोलीस व आणखी एक इसम हजर होता. तेथे घटनास्थळ मनोज गणपत भोसले याने दाखवले. त्या घटनास्थळावर मनोज भोसले याने त्याला मारहाण झाल्याचे सांगितले. पोलीसांनी तेथुन काही जप्त केले नाही परंतु फोटो काढले तसेच नकाशा तयार केला. घटनास्थळाच्या पुर्वेला नळाचा स्टॅन्ड, पश्चिमेला मोकळी जागा उत्तरेला कॅनल व दक्षिणेला दत्त मंदीर व गावात जाणारा रोड आहे. पोलीसांनी पंचनामा तयार केला. आता मला दाखवलेला **पंचनामा** तोच आहे. त्यावर क्र.०२ ची सही माझी आहे त्यातील मजकुर बरोबर आहे. पंचनाम्याला **नि.क्र. ४२** देण्यात येत आहे. पोलीसांनी पंचनामा ०४.०० वाजता सुरु करुन ०५.०० वाजता संपवला

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एन. जी. देशमुख यांच्यामार्फत सुरू...**

०२. मी पल्लवी पाटेकर हिला ओळखतो कारण ती गावातील राहणारी आहे. पल्लवी प्रमोद पाटेकरची मुलगी आहे. आमच्या गावी ऐनघर ग्रामपंचायत आहे. मला आमच्या ग्रामपंचायतीत बाळसई गावातील महादेव मोहिते असल्याचे माहित नाही. हे

मला माहित नाही की, महादेव मोहिते त्यावेळी ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य होते. मी फिर्यादी मनोज गणपत भोसले यास ओळखतो. मी त्याच्या आईला देखील ओळखतो. माझ्या आईचे नाव मिना आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई व मनोज भोसलेची आई सख्या बहिणी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मनोज भोसले आमचे नातेवाईक असल्यामुळे त्याचे आमच्याशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मनोज भोसले व आरोपी आमच्या गावातील वेगवेगळ्या विरुध्द पक्षातील सदस्य आहेत. कलावती कोकले सध्या आमच्या गावातील सरपंच आहेत. हे मला माहित नाही की, राजु श्रीराम सन २०२३ साली आमच्या ग्रामपंचायतीत सदस्य होता. घटनास्थळापासुन सावरटवाडी चार–पाच किलोमिटर अंतरावर आहे.

०३. पल्लवी ही बाळसई गावातील राहणारी आहे. परंतु हे म्हणणे खरे नाही की, ती नोकरी करते. हे मला माहित नाही की, सरपंच कलावती कोकले व ग्रामसेवक ढेरे व आणखी एक इसम यांनी पल्लवी व सोनल यांना ग्रामपंचायतीचे काम दिले होते. हे मला माहित नाही की, त्या सरपंच व ग्रामसेवक तसेच त्या एका इसमासी मनोज भोसलेचे चांगले संबंध होते. हे मला माहित नाही की, त्या सगळ्यांविरुध्द आरोपीने दिवाणी दावा ०५/२०२३ दाखल केला होता.

०४. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आमच्या बाळसई गावात आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळसई गाव आमडोशी ते वाकण गावी जाणा–या रस्त्याच्या दक्षिणेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळसई गाव त्या रस्त्याच्या दोन्ही बाजुला विभागला आहे. हे म्हणणे खरे नाही की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तसेच दत्त मंदीराच्या आजुबाजुला कोणाचीही घरे नाहीत. मी पंचनाम्यासोबत काढलेल्या नकाशावर सही केली होती. तो नकाशा मी त्यावेळी पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, नकाशात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा तसेच दत्त मंदीराच्या आजुबाजुला

कोणतेही घरे दाखवली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मनोज भोसले माझा सख्खा मावसभाऊ असल्यामुळे त्याला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या बोलावण्यावरुन पंचनामा करण्यासाठी घटनास्थळी गेलो तसेच मनोज भोसले याने दाखवल्याप्रमाणे पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व नकाशा व फोटो काढले व मी त्यावर सही केली असे खोटे सांगत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2025.10.29 18:35:04 +1100

स्थळ : रोहा.

(एस. व्ही. खैरे)

दि. २९.१०.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.